.. Vishnu Arati ..

# ॥ विष्णूची आरती ॥

संतसनकादिक भक्त मिळाले अनेक ।
स्वानंदें गर्जती पाहूं आले कौतुक ॥ १॥

नवल होताहे आरती देवाधिदेवा ।
स्वर्गींहुनी सुरवर पाहूं येती केशवा ॥ धृ ॥

नर नारी तटस्थ टक पडिलें नयना ।
ओवाळीतां श्रीमुख धणी न पुरे मना ॥ नवल ॥ २॥

एका जनार्दनीं मंगल आरत्या गाती ।
मंगल कौतुकें गाती ।
मिळाले वैष्णव जयजयकारें गर्जती ॥ नवल ॥३॥

इति

Please send corrections to sanskrit@cheerful.com
Last updated February 1, 1999